# नव-बौद्धधम्म मानवी मुक्तीचा मार्ग

**प्रा.कुलवीर कांबळे** सहाय्यक प्राध्यापक ,वाणिज्य विभाग , न्यू कॉलेज ,कोल्हापूर. kulveerbyss@gmail.com

---

**गोषवारा:**

डॉ. आंबेडकरांचा नव बौद्धधम्म ही एक क्रांतिकारी सामाजिक पुनरुज्जीवन बौद्ध चळवळ आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नवबौद्धधम्माचा उदय झाला, जेव्हा बाबासाहेबांनी त्यांच्या अनुयायांसह नव-बौद्ध धम्म स्वीकारला. ही जातिव्यवस्थेच्या विरोधात मानवी मुक्तीची चळवळ आहे. जातीव्यवस्था ही जी इतर जातींबद्दल पूर्वग्रह निर्माण करते आणि या पूर्वग्रहांनी भारतीय समाजातील सर्व सामाजिक संबंध व्यापलेले आहेत. यामुळे हा जातीव्यवस्थेबद्दल पूर्वग्रह अशा पद्धतीने चालतो की निम्न जातीचे लोक बहिष्कृत आणि शोषित होतात. आधुनिक काळामध्ये भारतामध्ये नवयान/नव बौद्धधम्म आवश्यक आहे कारण युरोपीय आधुनिकतेने जगाला दिलेले सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणजे शिक्षण, बाजार आणि राज्य हे भारतीय समाजामध्ये निम्न जातीच्या लोकांना संरक्षण देण्यात किंवा न्याय देण्यात अपयशी ठरले आहे. ते साधन भारतीय समाजात बदल घडवून आणू शकत नाहीत. संविधान कायदा हा धर्मनिरपेक्ष आहे, जो कोणीही मोडू शकतो तर बंधुभाव किंवा धर्म पवित्र आहे ज्याचा प्रत्येकाने आदर केला पाहिजे असे डॉ.बाबासाहेबांचे मत आहे म्हणूनच त्यांनी आपल्या अनुयायांसोबत स्वीकारलेला नव-बौद्धधम्म हा हिंदू धर्माने निर्माण केलेल्या जातीच्या विषमतेच्या पवित्र सामाजिक नैतिकतेचा प्रतिकार करण्यासाठी सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत आहे .त्यामुळेच मानवाची सर्वच प्रकारच्या गुलामीच्या व्यवस्थेतून मुक्ती होवू शकते व त्याचे मानवी मुल्य अबाधित राहू शकते. डॉ बाबासाहेबांनी नव-बौद्ध धम्माला समता आणि मुक्तीची शक्ती म्हणून पाहिले. हा संशोधनपरलेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नव-बौद्ध धम्माच्या स्वीकाराचा शोध घेतो.

मुख्य शब्द: नवायान/नव-बौद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जातिव्यवस्था, मानवमुक्ती, समता.

**प्रस्तावना -:**

बौद्ध धर्मातील नवायान मार्गाचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक-तात्विक क्रांतीच्या रूपात रचला. भगवान बुद्धाने सुरू केलेल्या बौद्ध क्रांतीच्या सुरुवातीच्या टप्प्यानंतर आणि त्यानंतर पुष्यमित्र शुंगाने केलेल्या ब्राह्मणवादी प्रति-क्रांतीनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नवायान हे धम्मरुपी तत्त्वज्ञान या विश्वासातून आणले की बुद्ध, धम्म, संघ या देशातील नागरिकांना नवीन आयुष्यासाठी मार्गदर्शक ठरेल. ज्याचा आधार हा स्वातंत्र्य ,समता आणि बंधुता ही मुल्ये आहेत. मानवाच्या सर्वच प्रकारे विकास होण्यासाठी , स्वतःच्या सत्याचा पाठपुरावा करण्याची संधी अत्यावश्यक आहे हे बाबासाहेबांनी जाणले होते. या दृष्टीकोनातून नवायान ही सुरुवात दर्शवते. ज्याद्वारे एखादी व्यक्ती स्वतःच्या सत्याचा पाठपुरावा करते. मनुष्याला विषमतेच्या ज्या जातिव्यवस्थेने हिंसकपणे नाकारले होते. भारतीय उपखंडामध्ये नवायान बौद्धधम्म हे तत्त्वज्ञान अनेक प्रकारे मानवी मूल्ये आणि सौंदर्याच्या पुनरुत्थानाची सुरुवात करते. ऐतिहासिकदृष्ट्या दबलेल्या बौद्धांना जातीवर्चस्व आणि जुलूमशाहीमुळे झालेल्या विनाशापासून मुक्त करण्याचे नवायान बौद्धधम्म हे प्रमुख साधन व अस्त्र आहे. भारतातील श्रेणीबद्ध जातिव्यवस्थेमुळे,भांडवली व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या सर्वच समस्यांवर इतर युरोपीय देशामधील निर्माण झालेली सैद्धांतिक तत्त्वज्ञाने समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त नाहीत. त्यामुळे बुद्ध धम्माशिवाय इतर कोणत्याही सैद्धांतिक चौकटीत कोणताही उपाय दिसून येत नाही.नवायान बौद्धधम्म हे सर्व समस्यांवर मात करण्यसाठी एकमेव माध्यम बनले आहे. जे भारतीय समाजातील परिवर्तनाची अपेक्षा ठेवणाऱ्या नागरिकांसाठी उपलब्ध आहे. जे सर्वात मूलभूत स्तरावर परिवर्तनाचा प्रयत्न करतात. व्यवहारातील ही पद्धत, ज्ञान निर्मितीच्या सर्व प्रवाहांमध्ये समाविष्ट करणे आवश्यक बनलेले आहे. प्रस्तुत पेपरमध्ये डॉ.बाबासाहेबांनी केलेल्या नवबौद्धधम्माच्या विश्लेषणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधन हेतू :**

1. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारलेल्या नवबौद्ध धम्माचा उद्देशांचा अभ्यास करणे .
2. नवबौद्धधम्म संकल्पनेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधनपद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत :** सदर शोध निबंध दुय्यम साधन सामग्रीच्या सहाय्याने लिहिण्यात आलेला आहे. यांसाठी उपलब्ध संदर्भ ग्रंथ, इंटरनेट मासिके यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांना दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्काम्मी बौद्ध धम्माची दीक्षा दिली. सम्राट अशोका नंतर सर्वात मोठे धम्मचक्र प्रवर्तन केले.दीक्षा देण्याच्या एक दिवस अगोदर म्हणजेच १३ ऑक्टोबर १९५६ साली सायंकाळी शाम हॉटेल मध्ये पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणतात,

" भगवान बुद्धाने जी धर्मतत्त्वे उपदेशिले आहेत तीच मी पाळणार आहे. हिनयान व महायान या बौद्ध धर्मातील पंथामुळे जे मतभेद झाले आहेत. त्यापासून मी माझ्या लोकांना अलिप्त ठेवणार आहे. आपला बौद्धधर्म एक प्रकारचा नवबौद्धधर्म किंवा नवयान आहे." डॉ.बाबासाहेबांच्या दृष्टीकोनातून नवायान म्हणजे नाविन्यता होय. त्याकाळी डॉ.बाबासाहेबांचा इतर प्रस्थापित असलेले धर्म सोडून बौद्धधर्म स्वीकारण्याचा निर्णय हा अनेक लोकांच्या पचनी पडलेला नव्हता. महाबोधी सोसायटीचे जे विश्वस्त होते त्या मंडळींना सुद्धा बाबासाहेबांचा हा निर्णय पचनी पडलेला नव्हता.त्यांनी बाबासाहेबांना पत्रलिहून जाहीर नाराजी व्यक्त केलेली होती. त्यांच्यामध्ये एक प्रकारची बौद्धिक धास्ती पसरलेली होती. कारण बाबासाहेबांच्या धर्मांतरापूर्वी भारतामध्ये बौद्ध धर्माचे अस्तित्व जरी असले तरी ते नगण्य होते.जो बौद्ध धर्म अस्तित्वात होता तो योग,तंत्र,वेद अशा संकल्पनाने प्रभावीत होता तर बौद्धधर्माचा व्यवहार सुद्धा ब्राह्मणीधर्मापासून वेगळा दिसत नव्हता अशा नैराश्यपुर्ण वातावरणामध्ये सुद्धा अस्तित्वात असलेल्या बौद्ध धर्माच्या प्रस्थापित समजल्या जाणाऱ्या बौद्ध धर्माची शिकवण देणाऱ्या मंडळीकडून बाबासाहेबांच्या धर्मांतराशी आपला काडीमात्र संबंध नाही अशा प्रकारचे त्यांचे एकूण वर्तन होते. त्यामुळे नवायान म्हणजे अस्तित्वात असलेल्या पारंपारिक बौद्ध धर्माची साफसफाई ,नवी टवटवी किंवा पुनरुत्थान होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. नवायान बौद्धधम्माचा मुलभूत आधार हा डॉ .बाबासाहेबांनी धम्मचक्र प्रवर्तनाच्या वेळी आपल्या अनुयायांना दिलेल्या २२ प्रतिज्ञा आहेत. भारत देशाच्या बाबतीमध्ये विचार करताना या २२ प्रतिज्ञा म्हणजे मानवी मुक्तीच्या लढाईच्या व्यवहाराची /सामाजिक बदलाच्या व्यवहाराच्या नवीन सिद्धांताचे पुनरुत्थान होय. या प्रतिज्ञा म्हणजे हजारो वर्षाच्या सर्वच प्रकारच्या गुलामगिरीतून भौतिक व मानसिक मुक्ती मिळविण्यासाठीचा महामार्ग आहे. ज्यावरून सतत मार्गक्रमण केल्याने मनुष्याला मानसिक गुलामगिरीतून मुक्ती मिळणार आहे.

महायान व हीनयान यांचा इतिहास पाहता बुद्धा नंतर भिक्खूंनी स्वतः बुद्धवचनां मध्ये काही बदल व सुधारणा केल्या. त्याच प्रमाणे हिंदु धर्मातील काही विचारांचे संमिश्रण झाल्यामुळे महायान ,हीनयान बौद्धधम्मातील विचार हे खरोखरच बुद्ध वचन आहे याचा शोध घेण्यासाठी तीन निकष दिलेले आहेत.

1. तर्कसुसंगतता आणि विचारशीलता नसेल तर ते वचन बुद्धाचे नव्हे.
2. बहुजन हिताय ,बहुजन सुखाय हे बुद्ध वचन होय.
3. ज्या विषयी सम्यक ज्ञान आहे व ज्याविषयी सम्यक ज्ञान नाही अशा भागामध्ये बुद्धाचे विचारधन विभागले आहे.

वरील तीन निकषांच्या आधारे डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी भेसळयुक्त बौद्ध निकायातील खरे व सत्य बुद्ध वचन कोणते ते संशोधन करून बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात संकलित केलेले आहेत. बाबासाहेबांनी दिवस रात्र अभ्यास करून भगवान बुद्धांचे विचार या विश्वासमोर आणलेले आहेत. वरील तीन निकषांच्या आधारे महायान व हीनयानातील सत्य वचने संकलित करून ही बुद्ध वचनांची नव्या स्वरुपात मांडणी केली. यालाच बाबासाहेब नवयान किंवा नवबौद्धधम्म म्हणतात. तोच मुळचा बौद्धधम्म आहे. बौद्ध धम्माच्या तत्त्वाशी कोणतीही विसंगती नाही. पारंपारिक बौद्धपरंपरेमध्ये नव्याने प्रश्न उपस्थित केले या दृष्टीने तो नवायान आहे. धम्माच्या नियमांमध्ये किंवा विनयामध्ये आणि तत्त्वज्ञानामध्ये बदल करून डॉ. बाबासाहेबांनी नवीन क्रांतिकारक भूमिका मांडली. तत्त्वज्ञानामध्ये आणि विनयामध्ये बदल केल्यामुळे नवीन यान(पंथ) निर्माण होतो. या क्रांतिकारक भूमिकेमुळे संपूर्ण विश्वापुढे भगवान बुद्धांचे संघर्षात्मक स्वरूप आले.

बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या परिचय या भागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपली भूमिका स्पष्ट करतात. " निकायांवर अवलंबून राहून बुद्धाची जीवनकथा सुसंगतपणे सादर करण्याचा जेंव्हा आपण प्रयत्न करतो तेंव्हा ती किती कठीण गोष्ट आहे हे प्रत्ययास येते. त्याहूनही त्यांच्या शिकवणीचा काही भाग सादर करणे अधिक अडचणीचे आहे असे आढळते. जगात जेवढे धर्मसंस्थापक होऊन गेले त्यांत बौद्धधर्माच्या संस्थापकाचे जीवन व शिकवण सादर करण्यास जी अडचण निर्माण होते ती गोंधळून टाकणारी नसली तरी पुष्कळ अवघड आहे, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. हे प्रश्न मांडावेत आणि त्यांवर त्यांना जितका प्रकाश टाकता येईल तेवढा टाकावा. ह्यासाठी अजून योग्य वेळ आली नाही काय ? ह्या प्रश्नांवर चर्चा व्हावी म्हणून ते इथे उद्धृत करण्याचे मी योजीत आहे " ही भूमिका मांडून वाचकांपुढे ते महत्त्वपुर्ण चार प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नांना बौद्ध परंपरेमध्ये पूर्वी कोणीही विचार केलेला नाही असे प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नांची उत्तरे मानवी दृष्टीकोनातून देतात म्हणजेच डॉ.बाबासाहेब पारंपारिक बौद्धधर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये बदल करतात. त्याची चर्चा खालील प्रमाणे करता येईल.

१) भगवान बुद्धांनी परीव्रज्या का ग्रहण केली ? याचे पारंपारिक उत्तर म्हणजे त्यांनी मृत देह,रुग्ण आणि जराजर्जर मनुष्य पाहिला हे तीन प्रसंग पाहिल्यानंतर तथागाताला दुखा:ची जाणीव झाली हे परंपरेने दिलेले उत्तर तर शाक्य आणि कोलीय यांच्या मध्ये रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटपावरून संघर्ष होत असे. या संघर्षाचा परिणाम म्हणून शाक्यांनी कोलीयांवर आक्रमण करायचे ठरविले. या निर्णयाला सिद्धार्थाने विरोध केला. जर शाक्य आणि कोलीय यांच्यामध्ये युध्द झाले तर त्याचा फायदा कोसलाधिपती प्रसेनजीत यांस होईल आणि शाक्य व कोलीय यांना आपले सार्वभौमत्व गमवून कोसलाधिपतीचे मांडलिकत्व स्वीकारावे लागेल. यासाठी माझा युद्धास विरोध आहे. सिद्धार्थ हा शाक्य संघाचा सदस्य होता त्यामुळे शाक्य संघाचा युद्ध करण्याच्या निर्णयावर बहुमत झाले व सिद्धार्थ अल्पमतात आला त्यामुळे त्याला शिक्षा म्हणून शाक्य संघाने जे तीन पर्याय दिले

त्यामधील सिद्धार्थाने दुसरा पर्याय स्विकारून परिव्राजक होण्याचा मार्ग स्विकारतो. म्हणजेच रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटपावरून ऐहिक प्रश्नावरून निर्माण झालेल्या संघर्षातून बुद्धाने परीव्रज्या स्वीकारली अशी नवीन कारणीमीमांसा करून ऐहिक दु:खाच्या प्रश्नावर उपाय शोधण्यासाठीच बुद्धाने परीव्रज्या घेतली. अशा निष्कर्षा पर्यंत बाबासाहेब पोहचतात.

२) दुसरा प्रश्न चार आर्य सत्यांनी निर्माण केला आहे. बुद्धाच्या मूळ शिकवणुकीत त्याचा समावेश होतो काय? जर जीवन,मृत्यू आणि पुनर्जन्म दु:ख आहे. तर ह्या जगामध्ये सुख प्राप्तीसाठी धर्म किंवा तत्त्वज्ञान काहीच उपयोगी पडणार नाही ही तत्त्वे बौद्ध धम्मास निराशावादी ठरवितात. डॉ. बाबासाहेब धम्म ग्रंथामध्ये बुद्धांनी केलेली दु:खाची व्याख्या करतात. दु:ख म्हणजे सामाजिक व आर्थिक कारणांमुळे होणाऱ्या यातना व खेद होय. भौतिक साधन संपतीच्या असमान वाटपातून निर्माण होणाऱ्या यातना किंवा खेद म्हणजे दु:ख होय. हे दु:ख नष्ट करता येते हा आशावाद बाबासाहेब सांगतात. त्यामुळे बौद्धधम्म निराशावादी न ठरत आशावादी ठरतो. परंपरेने केलेल्या दु:खाच्या व्याख्येमध्ये आणि बाबासाहेबांनी सांगितलेल्या दु:खाच्या व्याख्येमध्ये फरक आढळतो.त्यामुळे दु:खाची संकल्पना केवळ मानसिक स्वरुपाची नसून ती ऐहिक व भौतिक आहे.

३) तिसरा प्रश्न हा आत्मा,कर्म आणि पुनर्जन्म ह्या तत्त्वाबद्दलचा आहे. बुद्धाने आत्म्याचे अस्तित्व नाकारले आणि कर्म व पुनर्जन्म यांविषयी प्रतिपादन केले. जर आत्मा नाही तर कर्म कसे असू शकेल ? जर आत्मा नाही तर पुनर्जन्म कसा असू शकेल ? बुद्धाने कर्म आणि पुनर्जन्म हे कोणत्या अर्थाने वापरले ? त्याकाळी ब्राह्मण वापरत त्यापेक्षा वेगळ्या अर्थाने वापरले काय ? असे जर असेल तर आत्म्याचा अस्वीकार आणि कर्म आणि पुनर्जन्म यांचा स्वीकार ही भयानक विसंगती नव्हे काय ? भगवान बुद्धाने कर्माची व्याख्या "जसे कराल तसे भराल" या तत्त्वानुसार केलेली आहे. मनुष्य आपल्या जीवनामध्ये जसे कर्म करतो तसेच आपल्या जीवनामध्ये फळ किंवा परिणाम हा त्याच्या मृत्यूपूर्वीच प्राप्त होत असतो मृत्यूनंतर नव्हे. मृत्यूनंतरचे मनुष्याचे अस्तित्व हे बुद्धाने नाकारलेले आहे.त्याचप्रमाणे बुद्धाने प्रतिपादन केलेला पुनर्जन्म हा भौतिक घटकांचा, संस्कारांचा होतो.उदा. आपण आंब्याची कोय पेरली तर त्यास आंबेच येणार केळी किंवा इतर दुसरे फळ येणार नाही. हा त्या फळाचा म्हणजेच आंब्याचा पुनर्जन्म होय. त्याचप्रमाणे आई-वडिलांकडून त्यांच्या पुढील पिढीमध्ये काही ठराविक अनुवांशिक गुणांचे संक्रमण होते त्याच प्रकारचे संस्कार पुढील पिढीमध्ये आढळून येतात. यालाच संस्कारांचा पुनर्जन्म असे म्हणतात. असा भौतिक घटकांचा आणि संस्कारांचा पुनर्जन्म भगवान बुद्ध प्रतिपादन करतात. पारंपारिक बौद्ध धर्माने सांगितलेल्या शून्यवादी व्याख्येपेक्षा भौतिक आणि संस्कारांच्या पुनर्जन्माची केलेली व्याख्या ही भिन्न आढळते.त्यामुळे बाबासाहेबांनी सांगितलेली पुनर्जन्माची संकल्पना ही पूर्णत : ऐहिक आहे.

४) चौथा प्रश्न भिक्खू संबंधीचा आहे. भिक्खू निर्माण करण्यास बुद्धाचा काय हेतू होता ? एक पुर्ण पुरुष निर्माण करणे हा हेतू होता काय ? की जनतेच्या सेवेला आपले आयुष्य वाहिलेला आणि त्यांचा मित्र,मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ असलेला एक समाज सेवक निर्माण करणे हा हेतू होता? जर भिक्खू हा केवळ पुर्ण पुरुष असेल तर बौद्ध धर्माच्या प्रसाराला तो उपयोगी होत नाही. यामध्ये पारंपारिक बौद्ध धर्मामध्ये भिक्खूचे ध्येय हे अर्हंतपद प्राप्त करणे हे आहे म्हणजे त्याने पुर्ण पुरुष होण्यासाठी बुद्धत्त्व प्राप्तीसाठी प्रयत्न करून तेवढी क्षमता आपल्यामध्ये विकसित केली पाहिजे. आपल्या वास्तव्यास असणाऱ्या लोकांमध्ये , समाजामध्ये भरपूर दोष आहेत त्याकडे दुर्लक्ष्य करून आपल्यातील विकार दूर केले पाहिजेत. आपण सुधारलो की सर्वजण आपोआप सुधारतील. अर्हंतपद प्राप्त करून पुर्ण पुरुष बनणे ही भूमिका पारंपारिक भिक्खू संदर्भात आहे. तर भिक्खू हा समाजाचा मित्र ,मार्गदर्शक, तत्त्वज्ञ असेलला समाजसेवक असावा यासाठी बुद्धांनी भिक्खू संघ निर्माण केला. भिक्खुचे प्रयोजन काय ? तर भिक्खू हा धर्मप्रचारासाठी आहे. भिक्खुने समाजाभिमुख चारिका करणे म्हणजे दिनचर्या करणे. तसेच भिक्खुला समाजास नि:पक्षपातीप्रमाणे मार्गदर्शन करता यावे म्हणून भिक्खुने संपत्ती धारण करण्यास बुद्धाने मज्जाव केला तर भिक्खुला लोकांची सेवा करताना कोणत्याही प्रकारचे बंधन किंवा अडथळा येवू नये यासाठी भिक्खुनी लग्न करू नये असा विनय भगवान बुद्धांनी बनविला असे स्पष्टीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात. भिक्खू संघाचे मूल्यमापनही ऐहिक दु:खाच्या किंवा प्रश्नांचा उपाय म्हणून करण्याचा प्रयत्न बाबासाहेब करतात त्यामुळे पारंपारिक बौद्ध धर्मामधील भिक्खुचे स्थान आणि बाबासाहेबांनी प्रतिपादन केलेले स्पष्टीकरण भिन्न आहे.

पारंपारिक बौद्ध धर्म संप्रदायामध्ये दीक्षा देण्याचा अधिकार हा सर्वस्वी भिक्खुना होता. सर्वसामान्य मनुष्याला दीक्षा देण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे सर्वसामान्य उपासकासाठी धम्मामध्ये प्रवेश करण्यासाठी प्रवेशाचा दीक्षाविधी नव्हता ही गंभीर मर्यादा होती. त्यामुळे सर्व साधारण उपासकाला एकाचवेळी अनेक धर्माचे पालन करण्याची मुभा राहत असे म्हणूनच बाबासाहेबांनी धम्मप्रवेशाचा दीक्षाविधी निर्माण केला. दरेकाने दरेकाला दीक्षा देण्याचा अधिकार बाबासाहेबांनी सर्व सामान्य मनुष्याला/उपासकाला बहाल केला. प्रत्येक उपासक हा इतर उपासकाला दीक्षा देवू शकतो. प्रत्येक उपासक /सर्वसामान्य मनुष्य हा धर्मगुरु होवू शकतो. यांमुळे धम्म नियमांमध्ये बदल डॉ.बाबासाहेबांनी करून सर्वसामान्य मनुष्याला अधिकार बहाल करून पारंपारिक बौद्ध धर्माच्या विनयामध्ये बदल केला. परंपरागत बौद्धधर्म संप्रदायांना बाबासाहेबांचा हा दीक्षा विधी मान्य नाही. पारंपारिक बौद्धधर्म संप्रदायाची भुमिका स्पष्ट करून बाबासाहेबांनी खालील प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

1. भगवान बुद्धाला काही सामाजिक संदेश सांगावयाचा नव्हता काय ?
2. भगवान बुद्धाने अहिंसा व शांती याशिवाय दुसरा काही सामाजिक संदेश दिला काय ?
3. भगवान बुद्धाने न्याय,प्रेम (मैत्री) स्वातंत्र्य ,समता ,बंधुता शिकविले काय ?
4. भगवान बुद्ध कार्ल मार्क्सला उत्तर देवू शकतो काय ?

   वरील सर्व प्रश्नांची होकारात्मक उत्तरे देवून धम्माची पुर्नमांडणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे. ही धम्माची पुर्नमांडणी परंपरागत बौद्धधर्म संप्रदायापेक्षा भिन्न आहे.

बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथामध्ये भगवान बुद्धाची शिकवण कोणती ? या अनुषंगाने बाबासाहेब चर्चा करतात. काहीच्या मते समाधी हा बुद्धाच्या शिकवणुकीचा भाग आहे. काहीच्या मते विपश्यना म्हणजे एक प्रकरचा प्राणायाम महत्वाचा आहे. काहीच्या मते बौद्ध धम्म म्हणजे केवळ दिक्षितांनाच सांगवायचा गुप्त मंत्र आहे.तर इतरांना ,तो एक सर्वांना उद्देशून उघडपणे सांगितलेला धम्म वाटतो. काहीच्या मते ती एक रुक्ष दर्शन पद्धती आहे. काहीच्या मते तो केवळ गूढवाद आहे, काहीच्या मते ते एक ऐहिक जीवनापासून स्वार्थी पलायन आहे. काहीच्या मते हृदयातील सर्व वासना आणि भावना यांचा पद्धतशीर विरोध शिकवणारे ते शास्त्र आहे. बौद्ध धम्मासंबंधी आणखी पुष्कळच भिन्नमतांचा संग्रह करता येईल. ही मत भिन्नता आश्चर्यकारक आहे. यांपैकी काही मते एकांगी विचारवंतांची आहेत. असे लोक म्हणजे ज्यांना बौद्धधम्माचे सार ,समाधी,विपश्यना किंवा दीक्षितांना प्राप्त होणाऱ्या गुप्त मंत्रात आहे. असे वाटते ते लोक.

भगवान बुद्धांच्या शिकवणुकीतील सामाजिक आशय वगळून इतर बाबींना महत्त्व देणाऱ्यांना बाबासाहेबांनी एकांगी विचारवंत असे संबोधित केलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर रंगून मधील आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेमधील भाषणामध्ये स्पष्ट करतात की, " भारतामध्ये ध्यान ,चिंतन,मनन आणि अभिधम्म या स्वरुपात भारतामध्ये बौद्धधम्माला प्रस्तुत करणे हे भारतीयांसाठी हानिकारक ठरेल " ही पारंपारिक बौद्धधर्म संप्रदायांपेक्षा बाबासाहेब नवीन दृष्टी नवायानाच्या रूपाने भारतातील नागरिकांना देतात. भारतामध्ये बौद्धधम्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी भारतात कोणत्या प्रकारचे उपाय केले पाहिजेत. या विषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्याच भाषणामध्ये स्पष्ट करतात. "भारतामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार,प्रसार हा ख्रिस्ती मिशनरीज प्रमाणे केला पाहिजे." या बाबीवर धम्मचळवळीतील काम करणाऱ्या सर्वांनी चिंतन करण्याची आवश्यकता आहे.व्यवहारामध्ये कोणत्या प्रकारचे मिशनरी मॉडेल उभा करून ते कार्यरत केले पाहिजे याचा आजच्या काळात विचार होणे गरजेचे आहे.

धम्माचे प्रयोजन हे दुहेरी आहे. बुद्धत्व प्राप्त करणे व इहलोकी धम्मराज्य प्रस्थापित करणे तसेच धम्माची शिकवण ही केवळ नैतिक स्वरुपाची नसून ती सामाजिक ,बौद्धिक ,आर्थिक व राजकीय स्वरुपाची आहे असे बाबासाहेब प्रतिपादन करतात.

प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती या ग्रंथामध्ये इतिहासामध्ये बौद्धांना राजकीय सत्ता संघर्षामध्ये पराभव स्वीकारावा लागला. बौद्धांनी केलेली क्रांती यशस्वी का झाली नाही. याची मीमांसा करून १२ मे १९५६ च्या भाषणामध्ये ते म्हणतात. "दक्षिण आशियाई देशांनी सावध व्हावे आणि रशियन साम्यवादाच्या जाळयात अडकू नये अन्यथा त्यामधून ते कदापि बाहेर पडू शकणार नाहीत. त्यांनी आवश्यक आहे की , त्यांनी बुद्धाची शिकवण अनुसरावी आणि तिला राजकीय स्वरूप द्यावे." बौद्धधम्माचे राजकीय तत्त्वज्ञान निर्माण करण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करतात. जर अभ्यासकांनी प्राचीन भारतातील सांस्कृतिक क्रांती आणि प्रतिक्रांती ,बुद्ध आणि त्याचा धम्म आणि बुद्ध की कार्ल मार्क्स आणि हे एकत्रित पणे अभ्यासले तर बौद्धांच्या राजकीय प्रवाहाबाबत आकलन होते तसेच नवायान बौद्धधम्म हे बौद्ध सांस्कृतिक क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे.

डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी पारंपारिक बौद्ध धर्म संप्रदायांनी प्रज्ञा आणि करुणा यांना दिलेले स्वतंत्रपणे महत्त्व यांवर टीका करून प्रज्ञा आणि करुणा ह्या दोन्ही बाबी समान स्वरूपाने महत्वाच्या आहेत. त्या वेगळ्या करता येत नाहीत हे स्पष्ट केले. जगाची पुर्नरचना ही प्रज्ञा व करुणा यांच्या आधारावर होवू शकते हे स्पष्ट केलेले आहे.

**निष्कर्ष:**

डॉ. आंबेडकरांनी नवयान-बौद्धधम्म आपल्या लाखो अनुयायांसोबत स्वीकारणे ही जातिव्यवस्थेला आव्हान देण्यासाठी आणि सामाजिक मुक्तीला चालना देण्यासाठी एक धोरणात्मक चाल होती. नवयान- बौद्ध धम्माची त्यांची व्याख्या ही सामाजिक प्रतिबद्धता आणि समानता यावर भर देते, भावी पिढीला प्रेरणा देते. डॉ. आंबेडकर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचे समर्थन करतात ते म्हणतात की "सध्याची धार्मिक प्रणाली जरी निधार्मिक रचनेपासून अलिप्त असली तरी याच प्रणालीच्या आधारावर प्रत्येक निधार्मिक बाब टिकून आहे. दुरान्वये का होईना, धर्माची मान्यता असल्याशिवाय निधार्मिक रचना फार काळ टिकणे शक्य नाही. तसेच ते स्पस्ट करतात की "माझ्या जीवन विषयक तत्त्वज्ञानात स्वातंत्र्याला स्थान आहे. अनिर्बंध स्वातंत्र्य समतेला मारक ठरते. माझ्या तत्त्वज्ञानात समतेचे स्थान स्वातंत्र्यापेक्षा वरचे आहे. तरीसुद्धा त्यात संपूर्ण समतेला मात्र मुळीच थारा नाही. कारण अमर्याद समता ही स्वातंत्र्याच्या अस्तित्त्वाआड येते आणि स्वातंत्र्याला वाव असणे तर आवश्यक आहे. माझ्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य व समतेच्या अतिक्रमणापासून संरक्षण मिळावे म्हणूनच कायदेकानूनांचे स्थान

गृहीत धरलेले आहे. पण कायद्याचे स्थान मी फारच गौण मानतो. कारण स्वातंत्र्य व समतेच्या भंगाबाबतीत कायदा खात्रीने समर्थ ठरेल असा मला विश्वास वाटत नाही, मी बंधुभावाला सर्वोच्च स्थान देवू इच्छितो, कारण स्वातंत्र्य व समता नाकारली जाण्यासाठी बंधुभाव हाच खराखुरा रक्षक ठरतो.सहभाव हे बंधुभावाचे दुसरे नांव आहे. कायदा वा सद्दभावाचे मूल्यमापन करताना हा फरक जाणवतो याचे कारण कायदा हा धर्मातीत असल्यामुळे तो कोणीही मोडू शकतो, याउलट सहभाव अथवा धर्म हा पवित्र असल्यामुळे त्याला मान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य गणले जाते.'' म्हणूनच भारतीय समाजातील लोकांमध्ये बंधुभाव निर्माण होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नवयान बौद्धधम्माकडे मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान म्हणून पाहतात. अशा प्रकारे जगामध्ये अस्तित्वात असलेल्या इतर बौद्ध धम्म संप्रदाया पेक्षा वेगळी, मानवी दृष्टीकोनातून आधुनिक जगाला उपयुक्त अशा नवयान बौद्ध धम्माची मांडणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर करतात. बौद्ध धम्माच्या दृष्टीतून जगामध्ये निर्माण झालेल्या आणि भविष्यामध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांकडे /प्रश्नांकडे पाहण्याची नवीन दृष्टी देतात म्हणूनच ज्ञानमीमांसेच्या क्षेत्रामध्ये नवायान हा सिद्धांत म्हणून विकसित केला पाहिजे. ज्यामधून वर्चस्ववादी सांस्कृतिक प्रवाहांच्या विरोधामध्ये प्रतिसंस्कृती निर्माण होऊ शकेल. आधुनिक जगातील निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक या नवायान/नव-बौद्ध धम्माच्या माध्यमातून होवू शकते तोच मानवी मुक्तीचा मार्ग आहे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समस्त मानव समूहाला शिकवण आहे.

**संदर्भ ग्रंथ –:**

1. Buddha and His Dhamma, Author Dr. Bhimrao Ramji Ambedkar, B.A.W.S. Vol.11 ,Published by Education Department Govt. of Maharashtra 1992.
2. B.R.Ambedkar,The Buddha and His Dhamma, Edited,Introduced and Annoted by Aakash Singh Rathore and Ajay Verma, Oxford University Press YMCA Library Building,1 Jai Singh Road, New Delhi 110001,India. 2011.
3. Revolution and Counter Revolution in Ancient India – Dr. B.R.Ambedkar , B.A.W.S. Volume -3 ,Published by Govt. of Maharashtra 2008.
4. Navayana Buddhism, History, Context and Theory by Shaileshkumar Darokar, Subodh Wasnik, Bodhi S.R. Published by The Shared Mirror Publishing House, Hyderabad, E-book Edition 2019.
5. Classical Buddhism, Neo-Buddhism and the Question of Caste, Edited by Pradeep P.Gokhale, Routledge, First South Asia Edition 2021.
6. Buddhism in India-Challenging Brahmanism and Caste By Gail Omvet. SAGE Publications India Pvt. Ltd. New Delhi 2013.
7. आंबेडकरी धम्मक्रांतीपुढील आव्हाने :भाग १ ,डॉ .हर्ष जगझाप, क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १४ एप्रिल २००१ .